फौ. की. अ. क्र. ३८३/२०२२
जितेंद्र वि. न.पा.सावदा.

MHJG200017402022

**<u>नि. क्र. ०१ खालील आदेश</u>**
**<u>(पारित दि. ०२.०१.२०२३)</u>**

**०१.** प्रस्तूतच्या अर्जामधून अर्जदाराने आजीची मृत्यु नोंद जन्म मृत्यू रजिस्टर मध्ये घेण्याबाबत गैरअर्जदार हयांना निर्देश देण्याची मागणी केली आहे. अर्जदाराचे म्हणणे असे आहे कि, त्यांच्या आजीचा मृत्यु दि. ०७/११/२०२० रोजी मौजे सावदा, ता.रावेर येथे झाला आहे. परंतू नजर चुकीने अर्जदाराच्या आजीची मृत्यु नोंद करायची राहून गेली आहे. आता त्यांना शासकिय व निमशासकीय कामी अर्जदाराच्या आजीची मृत्यु नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदाराने आजीची मृत्यु नोंद घेण्याबाबत गैरअर्जदारास निर्देश देण्याची विनंती केली आहे.

**०२.** अर्जदाराने अर्जासोबत नगर पालिका कार्यालय सावदा हयांनी दिलेले जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्र दाखल केले आहे. त्याचे अवलोकन केले असता अर्जदाराच्या आजीची मृत्यु नोंद केलेली नसल्याचे दिसते.

**०३.** सामनेवाला हयांना नोटीस काढण्यात आली. त्यांनी नि. क्र. ०६ वर खुलासा दाखल करुन अर्जदाराच्या आजीची मृत्यु नोंद घेण्यास हरकत नसल्याचे सांगीतले आहे. अर्जदाराने अर्जाच्या पुष्टीदाखल नि. क्र. ७ वर शपथपत्र दाखल केले आहे. अर्जदाराने आजीची मृत्यु दिनांक ०७/११/२०२० रोजी सावदा येथे झाला असल्याचे शपथेवर सांगीतले आहे. तसेच प्रकरणात निशाणी १० वर दि. १३/१०/२०२२ रोजीच्या दै.बातमीदार हया वर्तमाप पत्रात जाहीर नोटीस काढण्यात आली. मात्र कोणीही अर्जास

हरकत घेतलेली नाही.

**०४.** अर्जदाराचे म्हणणे, दाखल केलेली कागदपत्रे हयांचे अवलोकन केल्यानंतर व अर्जदाराकडे स्वत: चौकशी केल्यानंतर अर्जदाराचे कुटुंबियांनी अर्जदाराच्या आजीचा मृत्यु नोंद माहीती अभावी केलेली नाही असे माझे मत झाले आहे. त्यामुळे सामनेवाला हयांना अर्जदाराची आजी नामे **लक्ष्मीबाई नथ्थू दुसाने हिचा मृत्यु दि. ०७/११/२०२०** रोजी झाला असल्याबाबत नोंद घेण्याबाबत निर्देश देणे आवश्यक आहे. त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

०१ अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

०२ गैरअर्जदार मुख्याधिकारी अधिकारी, न.पा.सावदा हयांनी अर्जदाराची आजी नामे **लक्ष्मीबाई नथ्थू दुसाने हिचा मृत्यु दि. ०७/११/२०२०** रोजी झाला आहे अशी नोंद त्यांचेकडील जन्म मृत्यु नोंदवहीमध्ये घ्यावी. नोंद घेत असतांना नियमाप्रमाणे काही विलंब शुल्क असल्यास ते अर्जदाराकडुन घेण्यात यावे.

ANANT HIMMATRAO BAJAD
Digitally signed by ANANT HIMMATRAO BAJAD
Date: 2023.01.02 16:44:43 +0530

रावेर
दि. ०२.०१.२०२३

**(अनंत हिम्मतराव बाजड)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
रावेर जि. जळगाव.